Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Impact Factor (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

# Changing Religious Movements in Pre-Medieval Indian History

17-18 January 2020 Special Issue - 101–Vol. II

**Chief Editor**
Mr. Arun B. Godam

**Guest Editors**
Dr. B. G. Gaikwad
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

**Co-Editor**
Dr. Balasaheb Shankarrao Kshirsagar
Head, Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

**Co-Editor**
Dr. Sandeep G. Londhe
Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

66

Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -101 ,Vol. II | Jan. 2020 | Peer Reviewed

# Index

1. लिंगायत धर्मांचे तत्त्वज्ञान
प्रा.डॉ.जी.व्ही.गट्टी 1

2. चिश्ती संप्रदायाचे हिंदू-मुस्लीम ऐक्यातील योगदान
प्रा.कानडे बालासाहेब गोविंदराव 4

3. गुरुनानक यांचो विचारसरणी
डॉ. ओ. व्ही. लिगाडे 6

4. संत नामदेवांच्या अभंगवाणीतील विविधतेचे दर्शन
प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु. 10

5. हैदराबाद मुक्तीसंग्रामामधील धार्मिक चळवळ : आर्य समाज
विकास यशवंता कांबळे 13

6. वाघळीचे मुधाईदेवी मंदिर
प्रा.डॉ.सोमवंशी एस.आर. 16

7. महाराष्ट्रातील स्त्री संतांचे सामाजिक संस्कृतिक कार्य
प्रा. मल्हारी पवार. 19

8. पुर्व मध्ययुगीन काळातील भक्ती चळवळ
प्रा.डॉ.राठोड यु.सी. 22

9. मध्ययुगाच्या जडन घडणीत भक्ती चळवळीचे योगदान
प्रा.डॉ. वसंत व्यंकटराव कदम 25

10. शिख पंथ प्रर्वतक : श्री गुरू नानक देवजी
प्रा. किशन मिराशे 28

11. धार्मिक चळवळ : संत रविदास यांचे सामाजिक सुधारणेतील योगदान : एक अभ्यास
डॉ.रामभाऊ दंवराव काशीद 30

12. धार्मिक चळवळ आणि रामानुजाचार्य यांचे सामाजिक सुधारणेतील योगदान
डॉ.नाईक एन.डी. 32

13. मध्ययुगीन समाज व धर्म सुधारणा चळवळ आणि आव्हाने
प्रा. डॉ. सदाशिव बा. दंदे 34

14. सुफी सिलसीले व त्याचा पडलेला प्रभाव
प्रा. सचिन कोठेकर 37

15. महात्मा बसवेश्वरांची धर्मसुधारणा चळवळ
प्रा.डॉ.आर.बी.शेटे 39

16. गौतम बुध्दाने केलेली धार्मिक क्रांती
प्रा. डॉ. अंभुरे एस. डी. 41

17. वारकरी संप्रदायाचे धार्मिक चळवळीतील योगदान
प्रा.डॉ.साईनाथ शेटोड 43

18. संत नामदेवांच्या अभंगातील धार्मिक चळवळींचा आढावा
प्रा.सिध्दार्थ इंगोले 45

19. पुर्व मध्ययुगीन धार्मिक चळवळीचा राजर्षी छत्रपती शाहू महाराजावर पडलेला प्रभाव- हिंदू-मुस्लीम एकता एक अभ्यास 47

67

Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue - 101 ,Vol. II | Jan. 2020 | Peer Reviewerd

# संत नामदेवांच्या अभंगवाणीतील विविधतेचे दर्शन

*प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु.*
इतिहास विभाग प्रमुख, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना :**

*सिंपियाचे कुळी जन्म झाला माझा । परी हेतु गुंतला सदाशिवा ।।*
*रात्रि माजी सिवी दिसामाजी सिवी । आराणुक जीवी नोव्हे कदा ।।*

महाराष्ट्रात प्राचीन काळापासून आजतागायत अनेक भक्ती संप्रदाय, पंथ, चळवळी उदयाला आले व त्यांनी आपल्या कार्याद्वारे वेगळी अशी ओळखही निर्माण केली होती. या अशा भक्ती चळवळी पैकी वारकरी संप्रदायाचे नाव अगदी अग्रक्रमाणे घेतले जाते. समता, बंधुता या अशा मुल्यांवर आधारित असणाऱ्या व स्त्री-पुरूष समानता मानणाऱ्या या संप्रदायाने आपली वेगळी अशी छाप महाराष्ट्रावरच नव्हे तर सबंध जगावर सोडली आहे. या अशा नावलौकीक प्राप्त संप्रदायात अनेक संतांनी आपल्या कार्यातून सहभाग नोंदविला आहे. या संत परंपरेत ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, जनाबाई, गोरा कुंभार, मुक्ताबाई, चोखामेळा, एकनाथ, तुकाराम आदी संतांबरोबरच नामदेवांचे नावही अग्रक्रमाने घेतले जाते.

इ.स. 1270 मध्ये दामाशेटी व गोणाई यांच्या पोटी नामदेवांचा नरसी नामदेव (जि. हिंगोली) येथे जन्म झाला. परिवाराकडून त्यांना विठ्ठल भक्तीचा वारसा मिळाला होता. पुढे तो वर्धिष्णु करण्याचा चंगच जणू त्यांनी बांधला होता. त्यासाठी त्यांनी अभंगाचा उपयोग सुरू केला. त्यांच्या अभंगाचे संपादन सर्वश्री जोग, आवटे आणि सुबध भाग 1 ते 3 असे त्यांनी केले आहे. आज महाराष्ट्र राज्य शासनाच्या संपादन समितीने संपादित केलेल्या नामदेवांच्या अभंग वाङ्मयाचा साठा आज सर्वांना उपलब्ध आहे. एकूण 2500 अभंग नामदेवांच्या नावावर असल्याचे नमूद करण्यात आले आहे. पांगरकरांसारख्या विद्वानांनी ज्ञानेश्वर कालीन नामदेवाचे 500 ते 600 पर्यंतच अभंग असावेत असे मत नोंदविले आहे. असे असले तरी वारकरी सांप्रदायाची पताका पंजाबापर्यंत फडकावणाऱ्या नामदेवांनी बालक्रीडा, कृष्णलीला, विठ्ठल आणि पंढरी महात्म्य, ज्ञानेश्वर आदी भावंडाची चरित्रे, आत्मचरित्र, पौराणिक कथानके, काही गौळणी आदी प्रकारचे वाङ्मय आपल्या अभंग वाणीतून रचले आहे.

अशा या सर्वव्यापी असणाऱ्या त्यांच्या अभंग रूपी विशाल वाङ्मयातून काही अभंगाद्वारे त्यांनी रचलेल्या विविधतेचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेण्यात आला आहे.

**अभंगातील विविधता :**

**पारिवारीक अभंग :**

संत नामदेव हे पंढरपुरच्या विठ्ठलाचे भक्त होते. त्यांनी या संदर्भात अनेक अभंगाची रचना केली आहे. या अभंगाबरोबरच त्यांनी स्वतः विषयी व परिवार विषयी माहिती देणाऱ्या काही अभंगांचीही रचना केली आहे. संत नामदेवांचा विवाह हा राजाईशीवाई सोबत झाला होता आणि त्यांच्यापासून त्यांना नारायण, महादेव, गोविंद आणि विठ्ठल अशी चार पुत्रे प्राप्त झाली होती तसेच लिंबाई नावाची मुलगीही झाली होती असे त्यांनी स्वतः आपल्या अभंगरूपी आत्मचरित्रातून सांगितले आहे. ते पुढील प्रमाणे,

*नारा, विठा, गोंदा, महादा चवघे पुत्र । जन्मले पवित्र त्यांचे वंशी ।*
*लडाई, गोडाई, येसाई, सखाराई । चवघी सुनापाही नाम याच्या ।*
*लिंबाई ती लेक आणुबाई बहिण । वेडीपिशी दासी त्याची जनी ।।*[1]

**गुरू व गुरूकृपेवर अभंग :**

नामदेव गुरू बनविण्यासाठी विसोबा खेचरांकडे जातात तेंव्हा ते पहिल्यांदा विसोबा खेचरांना पाहतात. तेंव्हा खेचर हे खुशाल शिवशंकराच्या पाडीवर पाय ठेवुन झोपलेले असतात. हे सर्व पाहून नामदेवांच्या मनात त्यांच्या बद्दल राग येतो व ते पुढे होऊन विसोबाचे पाय उचलुन दुसऱ्या जागी ठेवतात परंतु तेथेही त्यांना पिंड दिसते. विसोबा खेचरांच्या या अवस्थेला उद्देशुन नामदेवांनी पुढील प्रमाणे वर्णन केले आहे.

*खेचर विसा प्रेमाचा पिसा ।*
*तेणे नामा कैसा उपदेशिला ।।*

परंतु पुढे जेंव्हा विसोबा खेचरांनी परमात्मा हा सगळ्या विश्वात, सर्वव्यापक असून तो सगुण रूपाने विटेवर उभा आहे असा अनुभव त्यांनी अशा प्रसंगाने करून दिला. अशा या शिवकवणीमुळे आपली विठ्ठल भक्ती ही संकुचित न राहता सर्वव्यापी व अधिक प्रगाढ व सखोल झाली असे संत नामदेव म्हणतात. त्यांचा हा अनुभव त्यांनी पुढील अभंगातून सांगितला.

*माझा सुख मज दावियले डोळ । दिधली प्रेमकळा नाममुद्रा ।*
*नामा म्हणे बोल बोलताही बोला । खेचरी दाखविल प्रेमभक्ती ।।*[2]

अशा प्रकारे गुरूच्या कृपा प्रसादाने नामदेव कृतार्थ झाल्याचे दिसते. पुढे यातूनच प्रेरणा व स्फुर्ति घेऊन 'शतकोटी तुझे करीन अभंग', अशी त्यांनी ईश्वरा जवळ कल्पना मांडली आणि 'नामा म्हणे जरी न होता संपूर्ण । जिव्हा उतरी न तुजपुढे ।।' असे म्हटले.



Scanned with OKEN Scanner

विसोवा खेचर स्वामीच्या कृपेने आत्मप्रचिती होण्याने मी आता आनंदाने किर्तन भजनात नाचेन आणि त्या योगे ज्ञानाचा प्रकाश प्रज्वलित करीन असे,

*नाचु कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।*
*सर्व सत्ता आली हाता । नामयाचा खेचर दाता ।।*

संत नामदेव म्हणतात व आपल्या ज्ञान वाढीचे सर्व श्रेय ते खेचर स्वामीला देतात.

संत नामदेव पुढे भक्ती मार्गाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी उत्तर भारतातील पंजावकडे जातात. या परिसरात त्यांनी नामाचे, गुरूचे महत्त्व पटवून सांगितले होते व ते गुरूच्या अनुग्रहाची आवश्यकता सांगताना ते कधी मागे हटल्याचे दिसत नाही. त्यांच्या अभंगापैकी एकूण 61 अभंगाची पदे ही 'गुरूग्रंथ साहेब' या शीख धर्मीयांच्या धर्म ग्रंथात आढळतात त्यापैकीच एक अभंगात ते गुरूची महिमा गाताना म्हणतात,

*जऊ गुरू देऊ त मिलै मुरारी । जऊ गुरू देऊ त उतरै पारी ।*
*जऊ गुरू देऊ त संसार टुटै । जऊ गुरू देऊ त जम तै छुटै ।*
*जऊ गुरू देऊ त भऊजल तेरे । जऊ गुरू देऊ त जनमिन मरै ।।*[3]

गुरूदेव मिळाले तरच तुच मुरारीची प्राप्ती होते. भव समुद्र पार करता येतो, संशय समुळ नाहीसा होता, यमापासून सुटका होते आणि जन्ममरणाच्या फेऱ्यातुन मुक्ती मिळू शकते. साहजिकच गुरूदेव सोडून दुसरीकडे जाऊ नका. असा त्यांचा आग्रह आहे. गुरूची प्राप्ती होणे कठीण परंतु सुदैवाने गुरूची भेट झाली व त्यांचा अनुग्रह झाल्या नंतर रामनाम हृदयात पक्के ठसते. 1

**कोमल व दयाळू अंतःकरणाचे दर्शन :**

*आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा । माझीया सकळा हरीच्या दासा ।*
*कल्पनेची बाधा न हो कोणा कळी । ही संत मंडळी सुखी असो ।*
*अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णुदासा भाविकासी ।*
*नामा म्हणे तया असावे कल्याण । ज्या मुखी निधान पांडुरंग ।।*[4]

वरील प्रमाणे शब्द प्रहार करताना आणि भक्ती मार्गाच्या भावनेने परमेश्वराला आळविताना संत नामदेवांच्या शब्दात विशेष असा एक प्रकारचा प्रेमभाव हा त्यांच्या अभंगवाणीच्या मधुरतेसाठी परिणामकारक ठरताना दिसून येतो. एक प्रकारे वारकरी पंथातील भक्तांच्या सहवासाने व पंढरपुराच्या विठ्ठलाच्या नाम जपाने व कीर्तनाच्या सातत्याने त्याचे हृदय कोमल बनल्याचे दिसून येते. त्यामुळेच त्यांच्या अभंगवाणीतून साधेपणा आणि कोमलता दिसून येते. अशा कोमलतेबरोबरच स्वभाव व परिस्थितीतील दोष सापेक्ष कठोरता ही आढळून येते. एकंदरीत त्यांच्या अभंगरचनेतून त्यांची शांत, प्रकृती, अंतर्मुख वृत्ती व कोमल, दयाळू अंतःकरणाची वृत्ती अनेक अभंगातून दिसून येते. असाच प्रकार त्यांच्या अनेक अभंगातून त्यांच्या साधक जीवनातील प्रवळ अशा मनोवृत्तीचा उत्कट अविष्कार झाल्याचे दिसून येते. भूतकालीन जीवनाबावत अनुताप आणि ईश्वर प्राप्तीची आस त्यात तीव्रतेने दिसून येते. कारूण्य, वात्सल्य, औदासीन्य, विरोध, माधुर्य असे भाव व्यक्त करणारे अभंग आत्मनिष्ठ काव्याचे उत्कट आणि भव्य कल्पनांच्या त्यात भरणा नाही. मात्र भाव कोमल अंतःकरणात उमटणाऱ्या तरंगाकाराचे सौंदर्य मात्र उत्कटतेने जाणवते. ईश्वर दर्शनासाठी त्यांचे मन आतुर झाले असता 'शिणले डोळुते पाहता वादुली अवस्था दाटली ह्या माजी' अशी त्याच्या मनाची स्थिती होते. त्यावेळी ते अत्यंत काकुळतीला येऊन म्हणतात,

*वाठवेळ का लाविता । कोण्या भक्ताने गोवीला ।*
*झडकरी ये गा विठ्ठल । कंठ आळविता शोषला ।*
*वाट पाहे दाही दिशा । जीवी धनोनि भरवसा ।*
*प्राण केंव्हा येईल माझा । आलिंगीत चट्टू भुजा ।*
*नामा म्हणे गहिंवर दाटला । देह धरणिये लोटता ।।*[5]

अशा प्रकारे अनेक अभंगातून संत नामदेवांच्या मनाच्या कोमलतेचे व दयाळू अंतःकरणाचे आपणास दर्शन होते.

**विठ्ठल भक्तीवरील अभंग :**

संत नामदेवांच्या सगुण ईश्वराच्या अस्तित्वाचे स्वरूप त्याच्या पुढील अभंगातून दिसून येते.

*जीव विठ्ठल आत्मा । परमात्मा विठ्ठल विठ्ठल ।*
*जनक विठ्ठल जननी विठ्ठल । सांसरा विठ्ठल सांगाती ।*
*अहिक्य विठ्ठल परत्र विठ्ठल । निरंतर विठ्ठल तारीता ।*
*नाम विठ्ठल रूप विठ्ठल । पतित पावन विठ्ठल विठ्ठल ।।*[6]

अशा प्रकारे नामदेवांची ईश्वर विषयक कल्पना विठ्ठल रूपातच समित झालेली दिसली तरी त्यांच्या साक्षात्कारी मनालाही सर्वत्र सर्वव्यापी परमेश्वर रूपी विठ्ठलाचे रूप त्यांना दिसते. एकंदरीत संत नामदेवांच्या अध्यात्मिक जीवनाचा क्रम हा सगुणाकडून निर्गुणाकडे व अलौकिकाकडून लौकिकाकडे झालेला दिसून येतो. संत नामदेवाने परमेश्वर हा मानरूपी असल्याकारणाने त्या संबंधीचो त्यांची



Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue - 101 ,Vol. II | Jan. 2020 | Peer Reviewerd

भक्ती पूर्ण भावना अत्यंत विलक्षण व तीव्र उत्कटीत झालेली दिसून येते. अशाप्रकारे त्यांनी आपल्या अनेक अभंगातून नीस्सीम भक्ती भावनेचा आविष्कार आपल्या अनुभुतीस येतो.

**सहवासपर अभंग :**

नामदेवांनी आपल्या अभंगवाणीतून काही सहवासपर अभंगाची रचना केली आहे. या संदर्भातील अभंग पुढील प्रमाणे,

*लोखंडाचा विळ । परिसासी लाविला । मागिलि या मोला मागू नये ।।1।।*
*दासी होती परि सयासी । रतली मागिल ते बोलो बोलू नये ।।2।।*
*वेश्या होती तेंचि प्रतिव्रता जाली । मागील ते बोली बोलू नये ।।3।।*
*विष्णुदास नामा विठ्ठली रंगला । तो शिंपी वाहिला म्हणो नये ।।4।।*[7]

अशा प्रकारे संत नामदेवांनी सांगितले की, कोणाच्या संगतीने कोणाचेही भाग्य उदय होऊ शकतो. त्यासाठी त्याने लोखंड रूपी विळ जर का परिसाच्या सहवासात आला तर त्याचे लोखंडाचे नगण्य मोल जाऊन त्याला सोन्याचे मोल प्राप्त होते. एखादी दासी स्त्री असेल परंतु ती जर का राजाबरोबर राहू लागली तर तीचे दासीपण संपुष्टात येऊन तिला मोठेपण प्राप्त होतो. एखादी वेश्या जर पतीव्रतेप्रमाणे वागू लागली तर तीला पतिव्रतापण प्राप्त होते. अशा विविध दृष्टांताच्या माध्यमातून संत नामदेवांनी सहवासाचे महत्त्व विशद केले आहे. अभंगाच्या शेवटच्या चरणात विठ्ठल रूप ईश्वराच्या सहवासात राहिल्यास त्यांच्या भक्तीत, नामस्मरणात्त कीर्तनात रंगल्यास ईश्वराकडून त्याच्या आयुष्याचा उद्धार होतो असे ते म्हणतात व एकदा का ईश्वर रूपी छाया आपल्यावर पडल्यास आपल्या भुतकालीन गोष्टी विसरून जाणून त्याचे मोल नष्ट होते व आपणास नवीन मोल प्राप्त होते असेही ते म्हणतात.

**समाधीपर अभंग :**

संत ज्ञानदेव हे नामदेवांचे जीवलग सहृदय असल्यामुळे त्याचे 'श्री ज्ञानेश्वर चरित्र' काव्य हे नामदेवांनी आत्मीयतेने लिहिले. संत नामदेवांनी त्यांचे लोक उद्धारक कार्य, व्यक्ती महत्त्व यात लिहले आहे. या चरित्रात साडेतीनशे अभंग आहेत. त्यांची विभागणी 'आदी' तीर्थावळी आणि समाधी अशा तीन प्रकरणात केली गेली आहे. यातील समाधी हे शेवटचे असणारे तिसरे प्रकरण प्रसंगचित्रण आणि उत्कट भावनेने आविष्कारच्या दृष्टीने रेखाटले गेले आहे. यात ज्ञानेश्वर आपल्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर आलेले असताना अर्थात शके 1218 मध्ये आळंदी (जि. पुणे) येथे समाधी घेऊन आपल्या आयुष्याची साधना पूर्ण करणार असतात. अशा या महत्त्वपूर्ण घटनेच्या सुरूवातीपासूनच अर्थात संत ज्ञानेश्वरांनी समाधी घेण्याचे ठरविले होते. तेंव्हा पासून ते संत ज्ञानेश्वरांनी समाधी गाभाऱ्यात प्रवेश करून समाधीस्थ होण्यापर्यंत सर्व चित्र संत नामदेवांनी रेखाटले आहे. या संदर्भात संत नामदेव आपल्या अभंगात म्हणतात.

*आता मोक्षाचीया वाट । पहिला षंडचक्र चोहाटा आज्ञा द्यावी वैकुंठ । ज्ञानदेव म्हणे ।।*

अशी सुरूवात समाधीचरित्राची नामदेव करतात आणि या चरित्राचा शेवट ते,

*नामा म्हणे आता । लोपला दिनकर बाप ज्ञानेश्वर । समाधिस्थ ।।*[8]

अशा प्रकारे संत ज्ञानेश्वरांच्या समाधीस्थ होण्याने 'दिनकर लोपला' अशी सार्थ उपमा संत नामदेव देतात. तसेच या वेळी झालेल्या अनेक घटना घडामोडीची ही ते नोंद घेतात.

संत ज्ञानेश्वराच्या समाधी सोहळ्या बरोबरच संत नामदेवांनी श्री सोपान देवाची समाधी, श्री चांगदेव महाराजांची समाधी, मुक्ताबाईची समाधी, श्री निवृत्तीनाम महाराजांची समाधी, संत चोखा मेळ्याची समाधी आदी संताच्या समाधी सोहळ्याचे चित्रण त्यांनी आपल्या अभंगाद्वारे केल्याचे दिसून येते.

सारांश रूपाने आपणास असे म्हणता येईल की, इ.स. 1270 ते 1350 असा संत नामदेवांना ऐंशी वर्षाचे दीर्घ आयुष्य लाभले होते. या आयुष्यात त्यांनी किमान 2500 अभंगांची रचना केली. ते अभंग अनेक अंगांनी रचले गेले आहेत.

**संदर्भग्रंथ :**

1. संपा. प्रा. मारवाडे नरेंद्र : 'संत नामदेव विरचित तीर्थावळीचे अभंग', के. एस. पब्लिकेशन्स, पुणे, 2007, पृ.क्र. 8.
2. डॉ. मोकाशी पं. रा. : 'महाराष्ट्रातील पाच संप्रदाय', प्रसाद प्रकाशन, पुणे, 1975, पृ.क्र. 90.
3. डॉ. सौ. प्रतिभा मारावार : 'संताचा गुरूमहिमा', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, 1999, पृ.क्र. 108.
4. संपा. डॉ. देशमाने अशोक : 'संत नामदेव कृत तीर्थावळीचे अभंग', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, 2007, पृ.क्र. 15.
5. गोसावी र. रा. : 'पाच भक्ती संप्रदाय', मोघे प्रकाशन, पुणे, 1974, पृ.क्र. 119.
6. डॉ. इर्लेकर सुहासिनी : 'संत कवी आणि कवयित्री : एक अनुबंध', स्नेह वर्धन प्रकाशन, पुणे, 2006, पृ.क्र. 203.
7. संपा. डॉ. मोरे दादा : 'मराठी संताचे अभंग', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, 2003, पृ.क्र. 26.
8. डॉ. व्यवहारे निशिगंधा : 'संत नामदेवाची चरित्र काव्य रचना : स्वरूप आणि समिक्षा', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, 2012, पृ.क्र. 57.



Scanned with OKEN Scanner